नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १२९ Issue - 129 | वार बुधवार दि. २५ सप्टेंबर २०२४ Blow- Wednesday Date 25 September 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## पंढरपुरातील दर्शन मंडप, दर्शन रांगेसाठी १२९ कोटींची तरतूद

### पंढरपुरात तिरुपतीच्या धर्तीवर टोकन दर्शन सोय होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : येथील श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी १३० कोटी रुपयांच्या दर्शन मंडप आणि स्काय वॉक आराखड्यास तीर्थक्षेत विकास आराखडा शिखर समितीने मंजुरी दिली आहे, लवकरच या आराखड्यास राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी मिळेल. हा दर्शन मंडप उभा राहिल्यानंतर टोकन दर्शन सुविधा सुरु करण्यात येईल. ६ हजार भाविकांची सोय होणार आहे, अशी माहिती आ. समाधान आवताडे यांनी दिली.

यासंदर्भात अधिक माहिती देताना आ.आवताडे म्हणाले कि, तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर

**या बैठकीत बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित असलेल्या दर्शन मंडप आणि स्काय वॉक आराखड्यास शिखर समितीने मंजुरी दिली. भाविकांची वाढती संख्या आणि दर्शन रांगेत सुविधा पुरवताना प्रशासनावर येणारा ताण लक्षात घेता या आराखड्यास तात्काळ मंजुरी द्यावी अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली होती. त्यानुसार या शिखर समितीची बैठक झाली आणि १३० कोटींच्या विकास आराखड्यास मंजुरी मिळाली. यानंतर लवकरच राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या आराखड्यास मंजुरी मिळेल आणि लवकरात लवकर पुढील कारवाई सुरु होईल.**

समितीची मंगळवारी मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थतीतीत बैठक संपन्न झाली. या बैठकीस पालकमंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री अनिल पाटील, मुख्य सचिव सुजाता सौनिक, आ. शिवेंद्रराजे भोसले, आ. समाधान आवताडे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आदींसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या दर्शन मंडप आराखड्यात १६ हजार चौरस मीटरचा २ मजली दर्शन मंडप, आणि दर्शन मंडप ते विठ्ठल मंदिर पूर्व प्रवेशद्वार असा १०५० मीटर्स लांबीचा स्काय वॉक, दर्शन मंडप वातानुकूलित, दर्शन मंडपास ६ लिफ्ट आणि २ रॅम्प, लर्ल्ीं, ३०



### शिखर समितीची मंजुरी, आ. समाधान आवताडे यांची माहिती

पास स्कॅनींग काउंटर, हिरकणी कक्ष, उपहार गृह, वैद्यकीय सेवा,स्त्री, पुरुष आणि दिव्यांग व्यक्तींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, प्रथमोपचार सुविधा, अग्निशमन यंत्रणा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असणार आहे, भाविकांची गरज लक्षात घेता भविष्यात दर्शन मंडपाची क्षमता वाढवण्यात येणार आहे. सहा हजार भाविकांची क्षमता असली तरी आताच त्यात वाढ करून १० हजार भाविकांची क्षमता वाढवावी अशी मागणी आपण मुख्यमंत्र्यांकडे केलेली आहे. या दर्शन मंडपाची देखभाल पंढरपूर नगरपालिका करणार आहे, असेही आ. आवताडे यांनी सांगितले.

## राज्यातील २१ प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राज्यात मोठे, मध्यम, लघू प्रकल्प व साठवण तलावांची कामे सुरू आहेत. सिंचनासाठी बळीराजाला मुबलक पाणी उपलब्धततेसाठी प्रकल्पांच्या कामांना गती द्यावी. बळीराजाला सुखी, समृद्धी करण्यासाठी राज्याची सिंचन क्षमता वाढविणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रगतीपथावरील प्रकल्प पूर्ण करून राज्याच्या सिंचन क्षमतेत वाढ करावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिल्या. राज्यात २१ प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आल्यामुळे हे प्रकल्प पूर्ण होवून बळीराजाला सिंचनासाठी आणि शहरे, गावे यांना पाणीपुरवठ्यासाठी पाण्याची चिंताही मिटेल, असा विश्वासही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

जलसंपदा विभागाच्या सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये बांधकामाधीन २१ प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या. तसेच वर्धा जिल्ह्यातील आष्टी, वाढोणा - पिंपळखुटा या नवीन उपसा सिंचन योजनांना मान्यता देण्यात आली. तसेच निम्न वर्धा प्रकल्पा अंतर्गत महाजनको यांच्यामार्फत ७३२ हेक्टर जलाशयाच्या पृष्ठभागाचा वापर करून तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प प्रस्तावित आहे. यामधून अंदाजे ५०५ मेगावॅट वीजनिर्मिती होऊ शकणार असून या तरंगत्या सौर ऊर्जा प्रकल्पालाही मान्यता देण्यात आली.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, वाढवण बंदरामुळे पालघर जिल्ह्याचा झपाट्याने विकास होणार असल्यामुळे या भागात नागरीकरण वाढणार आहे. या भागात भविष्यात वाढणारी लोकसंख्या विचारात घेवून पाणीपुरवठ्यासाठी नवीन पाण्याचा स्त्रोत निर्माण करणे आवश्यक आहे. मुंबई महानगर प्रदेशातील सध्याची लोकसंख्या, भविष्यात वाढणारी लोकसंख्या, सद्यस्थितीत उपलब्ध असलेले पाणी, भविष्यातील पाण्याची गरज या सर्वांचा अभ्यास करून नियोजन करण्यात यावे. एकंदरीत सर्वंकष नियोजनासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात यावी. त्या पद्धतीने बृहत आराखडा तयार करण्यात यावा. कोकण पाटबंधारे विकास महामंडळाकडील ठेव तत्त्वावरील काळू प्रकल्प ठाणे, उल्हासनगर, डोबिंवली या भागाला पाणी पुरवठा करण्यासाठी फायदेशीर ठरणारा आहे. सुसरी प्रकल्पाचे काम पूर्ण करून यामध्ये वाढवण बंदरासाठी पाण्याचे आरक्षणाबाबत पडताळणी करण्यात यावी. सुसरी प्रकल्पासाठी निधी जवाहनरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टकडून मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे. वाढवण बंदरामुळे या परिसरात उद्योग, मालवाहतूक, गोदाम आदी वाढणार आहे. त्यामुळे रोजगारार्थ मोठ्या संख्येने लोक या भागात येणार आहे. त्यामुळे भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेवून सुसरी प्रकल्पाचे काम पूर्ण करावे, असे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. सुधारित प्रशासकीय मान्यता व विशेष दुरूस्ती प्रस्ताव मान्यता प्रकल्पांची कामे विहीत कालावधीत पूर्ण करावी. जलसंपदा विभागाने निधी मागणी प्रस्ताव, प्रशासकीय मान्यता प्रस्ताव ही एकच पद्धत ठेवावी. याविषयी कामकाज गतीने व समन्वयाने होण्यासाठी एक प विकसित करावे, अशा सूचनाही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

## अक्षय शिंदे एन्काऊंटर प्रकरणाची चौकशी सीआयडी करणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बदलापूर अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदे याचा सोमवारी पोलिसांनी एन्काऊंटर केला आहे. यावरून राज्यातील राजकीय वातावरण चांगलंच तापलेलं आहे. या प्रकरणाची चौकशी व्हावी अशी मागणी विरोधकांकडून होत आहे.अशातच आता या प्रकरणाबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. एन्काऊंटर प्रकरणाचा तपास केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे (उखऊ) सोपवण्यात येणार असल्याची माहिती आहे.

आज अक्षय शिंदेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी जे.जे. रुग्णालयात नेण्यात आला आहे. शवविच्छेदन झाल्यानंतर त्याचा मृतदेह त्याच्या कुटुंबियांकडे सोपवण्यात येणार आहे. अक्षयचा एन्काऊंटर झाल्यानंतर बदलापूरमध्ये लोकांनी फटाके फोडत आणि पेडे वाटत जल्लोष साजरा केला. तसेच शिंदे गटाच्या नेत्यांकडून सुद्धा बदलापूर रेल्वे स्थानकावर पेढे वाटण्यात आले.

सुप्रिया सुळे यांनी या प्रकरणारून गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांवर टीका केली आहे. त्या म्हणाल्या की, ''त्या नराधमाला फाशी मिळावी अशी माझी मागणी होती. त्याला भर चौकात सर्वांसमोर फाशी द्यावी, अशी आमची मागणी होती. मात्र कालची घटना घडली त्या घटनेची चौकशी झाली पाहिजे. त्याचा मृत्यू झाला ही वेगळी घटना आहे. मात्र गुन्हेगार हात बांधलेले असताना गोळी चालवतोच कसा ? एवढ्या पोलिसांसमोर त्याची हिंमत होते कशी ? सुदैवाने यामध्ये पोलिसाला गंभीर दुखापत झाली नसली तरी हे खूप गंभीर आहे. या संपूर्ण प्रकाराची चौकशी करावी, तसेच गृहमंत्र्यांनी उत्तर द्यावं अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी अक्षय शिंदेचं एन्काऊंटर करणाऱ्या पोलिसांना ५१ हजार रुपयांचं बक्षीस जाहीर केलं आहे. पैसे महत्त्वाचे नाहीत पण याचं उत्तर असंच दिलं पाहिजे, असं मनसे नेते अविनाश जाधव यांनी सांगितलं. तसेच, जे झालं ते योग्य झालं. मी याआधीच म्हटलं होतं. आमचं सरकार असतं तर थेट एन्काऊंटर केलं असतं. त्यामुळे झालेल्या घटनेचं आम्ही समर्थन करतो, असंही अविनाश जाधवांनी म्हंटले आहे.

## थोडक्यात

### काश्मीरमध्ये आज दुसऱ्या टप्प्याचे मतदान

श्रीनगर : जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात २६ जागांसाठी बुधवारी मतदान होईल. एकूण २३९ उमेदवार रिंगणात असून, २५ लाख मतदार हक्क बजावतील. काश्मीर खोऱ्यातील तीन तर जम्मूतील तीन अशा सहा जिल्ह्यांत हे मतदान होईल. दुसऱ्या टप्प्यासाठी कडेकोट सुरक्षा ठेवण्यात आली आहे. एकूण ३५०२ मतदान केंद्रे असून आहेत. दुसऱ्या टप्प्यात माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र रैना, जम्मू व काश्मीर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तारिक हमीद कारा हे प्रमुख उमेदवार आहेत. अब्दुल्ला हे गांदेरबल तसेच बडगाव या दोन मतदारसंघांतून रिंगणात आहेत. कारागृहात असलेला फुटीरतावादी सर्जन अहमद वॅघे ऊर्फ बरकती बीरवाहमधून रिंगणात आहे. पहिल्या टप्प्यात १८ सप्टेंबरला ६१.३८ टक्के मतदान झाले होते.

### मंडपाच्या साहित्याला आग लावून दीड लाखांचे नुकसान

सोलापूर : उत्तर सदर बझार येथील घराजवळ ठेवलेले मंडपाच्या व्यवसायाच्या साहित्याला आग लावून साहित्य नष्ट करून १ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी बाळकृष्ण पांडुरंग सदाफुले (वय-४०,रा.बॉम्बे पार्क,जुळे सोलापूर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून राहुल बंडू गुजले,बंडू गुजले व विठ्ठल गुजले (सर्व.रा.उत्तर सदर बझार) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना ६ ऑगस्ट रोजी उत्तर सदर बझार येथे घडली.या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अहिवळे हे करीत आहेत.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुण्यात दूरदृश्य प्रणालीद्वारे सोलापूरच्या नागरी विमानसेवेचा होणार शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूरच्या बहुप्रतीक्षित नागरी विमानसेवेला मुहूर्त अखेर मिळाला असून येत्या २६ सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुण्यात दूरदृश्य प्रणालीद्वारे सोलापूरच्या नागरी विमानसेवेचा शुभारंभ होणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर राज्यात विविध विकासकामांच्या शुभारंभासह भूमिपूजनांचा धूमधडाका सुरू आहे. त्याचाच भाग म्हणून सोलापूर विमानसेवेचा शुभारंभ घाईगडबडीत उरकला जात आहे.

केंद्र सरकारने यापूर्वी १५ जून २०१६ रोजी उडान योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यातच सोलापूर विमानसेवेला मंजुरी दिली होती. परंतु त्या अनुषंगाने सोलापूरच्या छोटेखानी विमानतळावर आवश्यक सुविधांचा अभाव असल्याने उडान योजना सोलापूरकरांसाठी कागदावर राहिली होती.

त्यानंतर सुमारे सात वर्षे विमान सेवेबाबत फारशा हालचाली झाल्या नव्हत्या. अलीकडे दोन वर्षांत विमानसेवेची मागणी जोर धरू लागली. परंतु विमानसेवेसाठी विविध ३६ अडथळे असल्यामुळे हा प्रश्न रखडला होता.

२६ सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी पुण्यात येत असल्याचे औचित्य साधून त्यांच्याच हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे सोलापूर विमानसेवेचा शुभारंभ करण्याचे ठरले. त्या अनुषंगाने सर्व प्रशासकीय प्रक्रिया युद्ध पातळीवर राबविण्यात आली.

सोलापूर विमानतळाची धावपट्टी तुलनेने छोट्या आकाराची म्हणजे २००९ मीटर लांबीची आहे. त्यामुळे येथून ४० आणि ७२ आसन क्षमतेची नागरी प्रवासी विमानसेवा उपलब्ध होणार आहे.

त्यासाठी सध्या फ्लाय ९१, स्टार एयर आदी तीन नागरी विमान वाहतूक कंपन्या सोलापूरच्या विमानसेवेसाठी तयार आहेत.

## कर्नाटकात राजकीय संघर्ष वाढीला; राजीनाम्याची मागणी सिद्धरामय्यांनी फेटाळली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बंगळुरू : उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर कर्नाटकात राजकीय संघर्ष पेटला आहे. सिद्धरामय्या यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी करत भाजपने मैसुरू, हुबळी आणि बेळगाव येथे निदर्शने केली. तर मुख्मयंत्र्यांनी भाजपची मागणी फेटाळून लावली. तसेच बंगळुरूमध्ये पत्रकार परिषद घेऊन केंद्रातील रालोआ सरकार विरोधी पक्षांच्या राज्य सरकारांविरोधात सूडाचे राजकारण करत असल्याचा आरोप केला. निकालानंतर, अशा प्रकारे चौकशी करण्यास कायद्याअंतर्गत परवानगी आहे हे शोधण्यासाठी आपण कायदेतज्ज्ञांची मदत घेणार असल्याचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी स्पष्ट केले. याप्रकरणी कोणत्याही तपासाला सामोरे जाण्यास मागेपुढे पाहणार नाही असे त्यांनी सांगितले. पत्रकार परिषदेमध्ये सिद्धरामय्या यांनी राजीनाम्याची भाजपची मागणी फेटाळताना आरोप केला की, केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील रालोआ सरकार विरोधी पक्षाच्या राज्य सरकारांना लक्ष्य करत आहे आणि सूडाचे राजकारण करत आहे. आपल्याविरोधातील आरोप हा विरोधकांचा आपल्या सरकारविरोधातील कट असल्याचा



आरोप त्यांनी केला. दुसरीकडे, भाजपच्या कार्यकर्त्यांनी सिद्धरामय्यांच्या राजीनाम्याची मागणी करत ठिकठिकाणी निदर्शने केली. मैसुरू, हुबळी आणि बेळगाव यासह अन्य ठिकाणी निदर्शने केल्याचे भाजपच्या नेत्यांनी सांगितले. उच्च न्यायालयाचा निकाल पाहता सिद्धरामय्या यांनी तातडीने राजीनामा द्यावा आणि तपासात सहभागी व्हावे, अशी मागणी भाजपच्या एका पदाधिकाऱ्याने केली.

**सोलापूर जि.प. पूनम गेटसमोर आंदोलन**

**मागण्या मान्य न झाल्यास २६ तारखेपासून मुंबईत आझाद मैदानावर करणार आंदोलन**

## चतुर्थ श्रेणीसाठी कोतवालांचे एकदिवसीय धरणे आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/ प्रतिनिधी : राज्यातील कोतवालांनी चतुर्थ चा दर्जा आणि इतर प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी आक्रमक भूमिका घेतली असून मंगळवार दिनांक २४ राज्यभरात जिल्हास्तरीय धरणे आंदोलन केले असून, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना लेखी निवेदन दिले आहेत. जर दोन दिवसात मागण्या मान्य न झाल्यास २५ तारखेपासून राज्यभर काम बंद आंदोलन सुरू करण्यात येणार आहे. अशी माहिती जिल्हाध्यक्ष विठ्ठल गुरव यांनी दिली. आणि गुरुवारपासून दि २६ पासून मुंबईतील आझाद मैदान येथे बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात येणार आहे महसूल प्रशासनातील कोतवाल महत्त्वाचे घटक आहे. महसूल गोळा करणे निवडणूक प्रक्रियेत व स्थानिक पातळीवरील नित्य नियमाची कामे पार पाडण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात अशा




विविध जबाबदाऱ्या पार पडत असून कोतवालाना अद्याप पर्यंत चतुर्थ श्रेणी चा दर्जा मिळाला नाही त्यामुळे त्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे वेतन आणि सुविधा मिळत नाही कोतवाल संघटनेच्या माहितीनुसार या मागण्यावर कोणतीही प्रभावी कारवाई झाली नाही त्यामुळे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा निर्णय घेण्यात आलेला आहे राज्यातील हजारो कोतवाले आंदोलनात सहभागी होणार असून आपल्या मागण्या मान्य होईपर्यंत हे आंदोलन सुरू असणार आहे.

कोतवाल महसूल विभागातील शेवटचा भाग आहे. तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत जाऊन प्रत्येकाच्या शंकेचे निरसन करणे, महसूल गोळा करणे, गौणखनीज आळा बसविणे, निवडणूक कामकाज, नैसर्गिक आपत्ती, पीक पाणी, दुष्काळात नुकसान भरपाई, पंचनामाचे सर्वेक्षण, करणे स्थानिक पातळीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील यासाठी पोलीस पाटील व पोलीस प्रशासनास मदत करणे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी यांना सहाय्य करणे अशा अनेक कामकाजात कोतवाल हा अत्यंत महत्त्वाचा घटक समजला जातो. मात्र, हा कोतवाल साठ वर्षापासून चतुर्थ श्रेणीसाठी सतत झगडत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व महसूल मंत्री यांनी तातडीने बैठक घेऊन कोतवालांचा विषय निघाली काढावा अन्यथा होणाऱ्या नुकसान राज्य शासन स्वतः जबाबदार राहणार आहे. त्यामुळे तातडीने बैठक घेऊन गेल्या पन्नास वर्षांपासून च्या मागणीचा निर्णय व्हावा अशी मागणी (पान २ वर...)

### सोलापूर येथे जिल्हा परिषद पुनम गेट येथे आंदोलन

**या संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील कोतवाल कर्मचारी सहभागी झाले होते... यावेळी महसूल कर्मचारी संघटना, तलाठी संघटना, चतुर्थी श्रेणी संघटना मध्यवर्ती संघटना, जिल्हा परिषद संघटना कृती समिती सोलापूर विविध संघटना जाहीर पाठिंबा दिला आहे... यावेळी शतुन गायकवाड प्रदेश उपाध्यक्ष महसूल कर्मचारी संघटना, अशोक इंदापुरे मध्यवर्ती महाराष्ट्र राज्य संघटना, , गजानन गायकवाड महसूल कर्मचारी संघटना कार्य अध्यक्ष, महेश बनसोडे इतर पदाधिकारी जाहीर पाठिंबा दिला.. विठ्ठल गुरव जिल्हाध्यक्ष सोलापूर याचा नेतृत्व आज एक दिवशी अदोलन झाले आहे...**

## संपादकीय....

# राज्यात संततधार

मध्य बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यात २८ सप्टेंबरपर्यंत पाऊस होणार आहे. याच घडामोडींमुळे गेल्या दोन दिवसांपासून मध्यम स्वरूपाचा पाऊस पडत आहे. मंगळवारीदेखील सकाळपासून आकाशात ढग दाटून आले होते. उकाडाही वाढला होता. दुपारी एकदरम्यान ढगांच्या गडगडाटासह पावसाला सुरुवात झाली. अचानक आलेल्या सरींमुळे नागरिकांची धांदल उडाली. तासभर जोरदार सरी बरसल्याने शहराच्या वेगवेगळ्या भागांत रस्त्यांवरून पाण्याचे लोंढे वाहत होते. अनेक ठिकाणी चौकांमध्ये पाणी साठले होते. तीनपर्यंत पावसाचा जोर कायम होता. यानंतर मात्र हलक्या सरी बरसल्या. पुढील दोन दिवस पावसाची तीव्रता अधिक राहणार आहे. आकाश दिवसभर ढगाळ राहून, ढगांच्या गडगडाटासह मध्यम ते जोरदार स्वरूपाचा पाऊस पडणार असल्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. पुन्हा संध्याकाळी मोठी सर येऊन गेली. वातावरणातील अनुकूल घडामोडींमुळे सक्रिय झालेल्या पावसाने सलग दुसऱ्या दिवशी जोरदार हजेरी लावली. शहराच्या बहुतांश भागात, जिल्ह्यात मंगळवारी जोराचा पाऊस पडला. थोड्या वेळाच्या विश्रांतीनंतर संध्याकाळपर्यंत संततधार सुरू होती. पुढील दोन दिवस पावसाचा मुक्काम कायम राहणार असल्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागातर्फे देण्यात आला आहे. यंदा पाऊसमान समाधानकारक झाल्याचे वर्तविण्यात येत असले तरी राज्यातील कित्येक जिल्ह्यात, गावांत म्हणावा तेवढा पाऊस न झाल्याने शेतकरी हतबल आहेत.

# चतुर्थ श्रेणीसाठी कोतवालांचे एकदिवसीय धरणे आंदोलन

(पान १ वरून..) सध्या जोरदार आहे.

कोतवाल कर्मचारी मागण्या :१) कोतवाल चतुर्थी श्रेणी दर्जा... २) कोतवाल पदनाम बदलून महसूल सेवक , ३) अनुकंपा बाबत, ४) कोतवाल मधून महसूल सायकल व तलाठी पदोन्नती बाबत इतर मागणीसाठी धरणे अदोलन

या आंदोलन यशस्वी होण्यासाठी विठ्ठल गुरव,अनिल जाधव, मलिनाथ बाळगी राहुल तोडकरी, प्रविणकुमार बाबर, भगवान पारशी, गोरख ढोबळे, प्रलहाद खरे, अवधुत पुजारी, गुरुदास आरणे भागवंत चंदनशिवे, जाकीर कागदे, प्रवीण गुजले , नवनाथ इंगोले, बदेनवाज डफेदार संजय कुरवडे उमेश क्षिरसागर, अर्जुन सनके, शहाजी हुलगे राजु साठे जिल्हा पदाधिकारी व तालुका पदाधिकारी धानया हिरेमठ, गौतम ठोकळे इरणा कांबळे, बालाजी व्हळे, देवा सावंत अनिल भोसले, समाधान सुरयंगध, दत्ता कदम, शिवानंद कोळी, श्रीशैल हक्के, रशीद शेख, सुदर्शन गुरव, सय्यद, सुरेश रामपुरे, रेवणसिधद सुतार, सुनील मुलगे स्वामीनाथ आलुरे, शिवशरण कोळी जगदीश देसाई मलपा कोळी हमीद शेख पिटु चव्हाण, पांडुरंग वाघमारे, कृष्णा इंगळे, कृष्णा लोखंडे महादेव खिलारे, हनुमंत पिसे,मल्हारी देवकाते,विश्वास बनकर,याकूब शेख,सुनील ठोंबरे,नवनाथ गेजगे इतर कोतवाल महिला कोतवाल कर्मचारी सुलोचना देशमुख गुरुदेवी चौधरी रेणुका कुंभार, सुचिता काळे ममता कोळी अबुबाई चव्हाण, वनिता कुंभार लक्ष्मी लाड कविता चव्हाण दिपाली स्वामी अश्विनी गायकवाड सरोजिनी कोळी ऐश्वर्या कांबळे रेशमा वाघमारे ,सुलोचना अदलिगे मनिषा शिंदे यासह इतर महिला कोतवाल कर्मचारी या अदोलन मध्ये सहभागी आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा निष्ठावंत नेता - बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे

बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांना बाबासाहेब आंबेडकरांचा उजवा हात म्हटले जात असे. ते खऱ्या अर्थाने बाबासाहेबांचे राजकीय, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक वारसदार होते. राजाभाऊ खोब्रागडे खंबीरपणे बाबासाहेबांच्या विचारांच्या सोबत असायचे. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर चळवळ व राजकारणाच्या सर्व क्षेत्रात बॅरिस्टर साहेबांचे योगदान लक्षणीय होते ! श्रीमंत घराण्यात जन्म घेऊनही बहिस्कृत अस्पृश्य वर्गाच्या हितासाठी व कल्याणासाठी त्यांनी स्वतःचे सर्व आयुष्य अर्पित केले.

बाबासाहेब आंबेडकरांनी व्हाइ-सरॉय कौन्सिलमध्ये अस्पृश्य विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी एक योजना मांडली होती. या संदर्भात चंद्रपूरचे धनाढय देवाजीबापू आणि इंदिराबाई या आंबेडकरी बाण्याच्या पोटी भाऊराव (राजाभाऊ) यांचा २५ सप्टेंबर १९२५ रोजी जन्म झाला. देवाजीबापू हे १९४५ ला राजाभाऊ यांना घेऊन बाबासाहेबांना भेटले. त्यांना बाबासाहेब म्हणाले, मी परदेशी शिष्यवृत्तीने १५ विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी पाठवित आहे. तुमची आर्थिक परिस्थिती चांगली आहे, त्यामुळे तुम्ही स्वतःच्या खर्चाने स्वतःच्या मुलाला (राजाभाऊला) परदेशी पाठविले, तर मी त्याऐवजी एक गरीब मुलाला आणखी पाठवू शकतो. बाबासाहेबांचे हे म्हणणे देवाजीबापू यांनी मान्य केले. त्यानंतर देवाजीबापूंनी स्वखर्चाने राजाभाऊ यांना बॅरिस्टर ही पदवी घेण्यासाठी लंडनला पाठविले.

राजाभाऊंच्या घरचे वातावरण हे राजघराण्यासारखे होते व राजाभाऊ हे नावाप्रमाणेच राजा होते. ते अत्यंत दयाळू, उदार दानी, कर्तव्यदक्ष व न्यायी होते. बॅरि. राजाभाऊंनी चंद्रपुरच्या जिल्हा व सत्र न्यायालयात वकिलीचा व्यवसाय सुरु केला. बाबासाहेब आंबेडकरांशी झालेल्या भेटीत देवाजीबापूंनी राजाभाऊला समाजाच्या सेवेसाठी अर्पण करावे अशी इच्छा बाबासाहेबांनी व्यक्त केली. त्यामुळे बाबासाहेबांचा हा आदेश स्वीकारून राजाभाऊंना समाजसेवेकरिता देवाजीबापूंनी समर्पित केले व राजाभाऊंनी दलितांच्या उत्थानासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वप्रणाली नुसार स्वतःला वाहून घेतले.

बॅरि. राजाभाऊ यांच्या संघटन चातुर्य, दलितनिष्ठा, कर्तृत्व व चळवळीप्रती इमानदारी याची ओळख बाबासाहेबांना झाली. बाबासाहेबांनी बॅरिस्टर मधील नेतृत्व क्षमता ओळखली. डॉ. बाबासाहेबांनी १९५५ मध्ये बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांना अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या 'महासचिव' पदी नियुक्ती केली. नवीन उमेदीच्या तरुणांना नेतृत्व देणे व पुढे करणे ही काळाची गरज आहे, हे त्यावेळी बाबासाहेबांनी हेरले होते. १ जानेवारी १९५७ ला अहमदनगर येथे बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या संघटनेच्या पदाधिकारी यांची बैठक झाली. यात सर्वानुमते बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या संस्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी व राजकीय रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्यासाठी 'प्रेसिडियम' स्थापन करण्यात आले, याचे अध्यक्ष म्हणून राजाभाऊ खोब्रागडे यांची निवड करण्यात आली.

१९५७ च्या निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समिती व शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन यांनी एकत्रित निवडणूक लढवली. राजाभाऊ खोब्रागडे व दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली प्रचाराचा झंझावात निर्माण झाला. निकालानंतर शे.का. फे. ला भरघोस यश मिळाले. यानंतर झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत फेडरेशनचे १७ आमदार निवडून आले. पंजाब मधून ५, कर्नाटक मधून २, आंध्रमधून १, गुजरात मधून २ व मद्रास मधून २ असे एकूण २९ आमदार निवडून आले. हे सर्व यश बॅरि. राजाभाऊ अध्यक्ष असतांना घडून आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेली शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन या पक्षाची संघटना, त्याकाळी भारतातील इतर कोणत्याही पक्षाच्या संघटनेपेक्षा अधिक सरस, अधिक सकस, अधिक सक्षम व समर्थ होती. या पक्षाचे अनुयायी, इतर कोणत्याही पक्षाच्या अनुयायांपेक्षा अधिक निष्ठावान व अधिक त्यागशील होते. बॅरिस्टर यांच्या अध्यक्षतेखाली सर्वानुमते निर्णय घेऊन ३ ऑक्टोबर १९५७ ला नागपूरमध्ये ७ लक्ष लोकांच्या उपस्थितीत 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' ची स्थापना करण्यात आली. एन. शिवराज यांना आर.पी.आय. चे प्रथम अध्यक्ष करण्यात आले होते.

बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे हे १९५८ ते १९६४, १९६६ ते १९७२ व १९७८ ते १९८४ या कालावधीत राज्यसभेचे सदस्य होते. यात डिसेंबर १९६९ ते १९७२ मध्ये बॅरिस्टर हे राज्यसभेचे उपसभापती पण होते. रिपाई ला राज्यसभेत उपसभापती चा बहुमान मिळाला. बौद्धांच्या सवलती, मागासवर्गीयांना बढतीत राखीव जागा, लक्ष्मी बँक प्रकरण, काश्मिरचे विलीनीकरण, अन्नधान्य धोरण, निवडणूक योजना, भाषावार प्रांतरचना, जमीनधारणा कमाल मर्यादा, पंचवार्षिक योजना, शिक्षणासाठी आर्थिक तरतूद, अनुसूचित जाती-जमाती अहवाल, राष्ट्रीय एकात्मता इत्यादी विषयावर बॅरि. राजाभाऊ यांनी संशोधनात्मक अभ्यासपूर्ण आणि वकृत्वशैलीयुक्त अशी भाषणे राज्यसभेत देऊन आपल्या वैचारिकतेचा परिचय घडविलेला होता. आंबेडकरी तत्वप्रणालीनुसार करण्यात आलेली तर्कनिष्ठ, कालसंगत आणि कल्याणकारी असे विश्लेषण आहे. अशा अनेक शिष्टमंडळाचे नेतृत्व त्यांनी केले.

माजी पंतप्रधान अटलबिहारी बाजपेयीसारखे मातब्बर पुढारी त्यांच्या नेतृत्वात सदस्य होते. लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांतील उपसभापती पद विरोधी पक्षाला द्यायची प्रथा आता रूढ झालेली आहे. राज्यसभेत ही प्रथा बॅरिस्टरांच्या निवडीपासून सुरू झाली. त्याकाळी सर्वश्री. भूपेश गुप्ता, राजनारायण, नानासाहेब गोरे, निरेन घोष, चॅटर्जी यासारखे रथी-महारथी सदस्य होते. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि व्ही.व्ही. गिरी यांच्यानंतर बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांनीच राज्यसभा कुशलतेनी हाताळली असं जाणकाराचं मत आहे. अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या वतीने १९५९ आणि १९६३ ला भूमिहिनांचा सत्याग्रह झाला. या सत्याग्रहाचा इतिहासात तोड नाही, याचे नेतृत्व हे दादासाहेब गायकवाड व बॅरि. खोब्रागडे यांनी केले होते. १९६४ च्या भूमिहीन सत्याग्रहाला केवळ रिपब्लिकन चळवळीत महत्वाचे स्थान आहे. तर या सत्याग्रहाचा जागतिक स्तरावर ऐतिहासिक महत्व आहे. या मोर्चाचे नेतृत्व हे दादासाहेब गायकवाड, बुद्धप्रिय मौर्य व बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांनी केले होते. या आर.पी.आय. पुरस्कृत सत्याग्रहाने भारत सरकारची झोप उडाली होती. या सत्याग्रहामुळे सरकारने एकूण ३७,५०० लोकांना एकूण २,५०,००० एकर जमीन वाटल्या गेली.

बॅरि. राजाभाऊंनी कामगार चळवळी चालवल्या, कोतवाल संघटन, बिडी मजदूर युनियन, डेमॉक्रॅटिक इंडियन ट्रेड युनियन (डीटू) या संघटना राजाभाऊंनी उभ्या केल्या आणि त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेले संघटनात्मक वैचारिक मूल्य व प्रतिष्ठा दिली. १४ ऑक्टोबर १९५६ ला नागपुरात बौद्धधम्म दीक्षा कार्यक्रम झाला त्यावेळी बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे हे अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचेचे सरचिटणीस होते. बाबासाहेबांचा जीवाला धोका होऊ नये व सुरक्षितेच्या दृष्टीने कार्यकर्त्यांचे एक गुप्तचर समूह नागपुरात टेहळणीसाठी नियुक्त केले. त्यानंतर देवाजीबापू खोब्रागडे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय बौद्ध जनसमिती ने चंद्रपूर मध्ये अल्प अवधीत १६ ऑक्टोबर १९५६ ला बौद्धधर्म दीक्षा कार्यक्रम बाबासाहेब आंबेडकरांच्या हस्ते संपन्न केला. चंद्रपुरात ३ लक्ष अस्पृश्यांना बौद्धधम्म दीक्षा देण्यात आली. यातील खर्चाचा सिंहाचा वाटा हा खोब्रागडे परिवाराचा होता.

१९६६ साली कृष्णवर्णीय नेत्यांच्या परिषदेला भारताचे प्रतिनिधी म्हणून इंदिरा गांधींनी आवर्जून राजाभाऊंना अमेरिकेला पाठवले होते. तिथे त्यांनी दलित आणि निग्रोंच्या प्रश्नाचा उहापोह तर केलाच पण जागतिक स्तरावर सर्व वंचितांनी एकत्र येण्याची आवश्यकता स्पष्ट केली. भूमिहीनांच्या आंदोलनासाठी ते आग्रही होते. शेतीचे राष्ट्रीयीकरण व्हावे, असे त्यांचे मत होते. खाणकामगार आणि विडी कामगारांच्या युनियनचे ते अध्यक्ष होते. त्यांनी मुंबई आणि दिल्लीत मोर्चे काढून त्यांच्यासाठी अनेक अधिकार मिळवले. नवबौद्धांना सवलती मिळाव्यात यासाठीचे त्यांचे आंदोलनही यशस्वी झाले. नवबौद्ध विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती देण्यासाठी राज्य सरकारला त्यांनी भाग पाडले. हुंडाबळीचा कायदा व्हावा यासाठी त्यांनी संसदेत खूप प्रयत्न केले.

विदर्भ संयुक्त महाराष्ट्रात यावा यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न महाराष्ट्र कधीच विसरू शकणार नाही. संसदेतही त्यांनी महाराष्ट्राची बाजू जोरदार उचलून धरली. पुढे महाराष्ट्रात विदर्भावर होणाऱ्या अन्यायाने ते खूप व्यथित झाले. सत्तरच्या दशकात त्यांनी स्वतंत्र विदर्भाची आणि छोट्या राज्यांची भूमिका मांडायला सुरुवात केली. राजाभाऊंचे अष्टपैलू व्यक्तिमत्वही तसेच करारी अन् दृढनिश्चयी होते. 'कॉंग्रेसचे तुम्ही केवळ चार आण्याचे सदस्य झालात तरी तुम्हला फार मोठे मोठे मंत्रीपद लाभेल' अशा प्रलोभनाची अनेकदा बरसात काँगेस श्रेष्ठीकडुन होऊनही त्याला त्यांच्या स्वत्वपूरित स्वार्थीनिवेशाने कधीच भीक घातली नाही व स्वाभिमानाने तळपणारी त्यांची अस्मिताही कधी कुणाकडे गहाण राहिलेली नाही, यालाच आत्मसन्मान म्हणतात.



राज्यसभेचे उपसभापती झाल्यानंतर प्रथमतः त्यांचे चंद्रपूरला आगमन झाले असतांना त्यांच्या एका जिवलग मित्राने अभिनंदन करतांना म्हटले, 'बॅरिस्टर साहेब, आपले तर जीवनच बदलून गेले आहे'. यावर राजभाऊ उत्तरले, 'अहो, कसला आलाय बदल? यापूर्वीही मी महिन्याचे पंचवीस दिवस बाहेर घालवायचो, आजही घालवितो. फरक एवढाच की आधी मी आगगाडीने प्रवास करायचो तर आता विमानाने करतो' सहज बोलता-बोलता अगदी अल्पशा शब्दात राजाभाऊ अनाहूतपणे फार मोठया अर्थाचा अविष्कार करुन गेले. या इवल्याशा शब्दातून व्यक्त झालेल्या आशयापेक्षा त्यातील अव्यक्त आशय कितीतरी महानकिती तरी गहन राज्यसभेचे उपाध्यक्ष असले काय किंवा नसले काय, समता, स्वातँय आणि बंधुत्वाच्या शिलालेखातून उगम पावलेली त्यांची जीवनसरीता अभंग आणि अखंड वाहिली आहे. भगवान बुध्द, संत कबीर, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक प्रबोधनाच्या वैचारिक परंपरेचे कर्णधार म्हणून बॅरि. खोब्रागडे भारताच्या इतिहासाच्या धवल पृष्ठांवर चिरंजीवी ठरले.

१९८१ मध्ये खासदार राजभाऊ यांनी राज्यसभेत बौद्धांचे धार्मिक स्थळ श्रावस्ती, कुशीनारा, बौद्धगया व नालंदा यांच्या विकासाचा आराखडा सरकारने तयार केला यासंदर्भात प्रश्न विचारला, नंतर सरकारने यावर कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या इमानदार रिपब्लिकन सेनापतीचे मृत्यू होण्यापूर्वी त्यांनी भारतात अस्पृश्य दलित, जमाती, अदिवासी, मागासवर्गीय, अल्पसंख्याक या वर्गाच्या हितासाठी जे शैक्षणिक, आर्थिक, नौकरीविषयक, शेती व भूमिहीनांना जमीन यासंदर्भात होते. याकरिता सतत राज्यसभेत खासदार म्हणून पाठपुरावा केला. दलितांना व बौद्धांना सतत न्याय मिळावा याकरिता सतत कार्य केले. बौद्धांची लोकसंख्या वाढावी व भारत बौद्धमय व्हावा हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न पूर्तीसाठी सतत बौद्धधम्म दीक्षेचे कार्यक्रम भारतभर करित राहिले. डॉ. बाबासाहेबांच्या निष्ठावान नेत्याचे दिल्लीत हृदयविकारामुळे परिनिर्वाण झाले. अशा महान व्यक्तिमत्वाच्या सन्मानार्थ, भारत सरकारने ११ नोव्हेंबर २००९ रोजी एक टपाल तिकीट जारी केले. रिपब्लिकन पक्षाच्या अशा थोर महापुरुषाला त्यांच्या ९९ व्या जन्मदिनानिमित्त विनम्र अभिवादन !

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९
ई-मेल : pravinbagdegmail.com

# कन्नड अभिवृद्धी प्राधिकार बेंगळूर यांच्या वतीने महाराष्ट्र राज्यातील ६५२ विद्यार्थ्यांना कन्नड माध्यम पुरस्कार सोहळा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : कर्नाटक - महाराष्ट्र सीमेवरील सोलापूर जिल्ह्यातील लोकांमध्ये कन्नड भाषाबद्दलचे प्रेम, मैत्री, आदर आणि आपुलकी पाहिली तर महाराष्ट्राच्या सीमेवर कन्नड भाषेचे उज्वल भविष्य आहे असे प्रतिपादन कन्नड अभिवृद्धी प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.पुरुषोत्तम बिलीमळे यांनी केले.

कन्नड विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष पुरुषोत्तमा बिलीमाले यांनी कन्नड माध्यमच्या शाळांनी मातृभाषा कन्नडवर विशेष भर देऊन पालकांमध्ये कन्नडविषयी प्रेम व आपुलकी निर्माण करून मातृभाषेला विशेष दर्जा दिला असल्याचे मत व्यक्त केले.

रविवारी सोलापूर येथील कर्मयोगी आप्पासाहेब काडादी सांस्कृतिक भवनात झालेल्या इयत्ता दहावी आणि बारावी मध्ये महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक कन्नड भाषिक प्रशालेत अनुक्रमे प्रथम,द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाविलेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे १२०००,११००० आणि १०००० रुपये बक्षीस ,प्रमाणपत्र स्मरण चिन्ह वितरण कार्यक्रमात बोलत होते

व्यासपीठावर माजी गृहराज्य मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, डॉ.संतोष हानगल, दाक्षायाणी हुडेद, विरुप्पणा कोल्लुर, डॉ बी बी पुजारी, सोमशेखर जमशेट्टी, डॉ. गिरीश जकापुरे, मलीकजान शेख, शरणप्पा फुलारी, शिवानंद गोगांव, बसवराज मसुती, डॉ गुरलिंगप्पा धबाले आदी उपस्थित होते.

डॉ.पुरुषोत्तम बिलिमले पुढे बोलताना म्हणाले की ,२० व्या शतकातील



महान अभ्यासक, विचारवंत, संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बी.आर. आंबेडकर हे महाराष्ट्रातील असल्याचा अभिमान आहे. मराठ्यांनी सीमेवरील कन्नडीगांना कन्नड-मराठी मातृभाषा जपण्यासाठी व तिचा विकास करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे आणि मातृभाषेला विशेष दर्जा मिळावा या साठी प्रयत्नशील राहून एकजुटीने कार्य करण्यासाठी आवाहन केले.

कन्नड माध्यम पुरस्कार वितरण करून माजी गृहराज्य मंत्री सिद्धाराम म्हेत्रे बोलताना म्हणाले की, कन्नड मातृभाषा टिकावी यासाठी जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातील कन्नड माध्यमाच्या शाळा, शिक्षक व पालक आपल्या मुलांना कन्नड माध्यमात शिक्षण देत आहेत. याशिवाय कर्नाटक सरकारच्या कन्नड अभिवृद्धी विकास प्राधिकरणाने सीमावर्ती भागातील कन्नड माध्यमात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम आणि पुरस्कार देऊन त्यांचे कौतुक करत असलेलं कार्य कौतुकास्पद असून कन्नड माध्यमात शिकलेल्या मुलांना कर्नाटक राज्यात नोकऱ्यांमध्ये आरक्षण मिळावे अशी विनंती कर्नाटक सरकारला केली. या समारंभात महाराष्ट्र राज्यातील ८४ हायस्कूल आणि २० कॉलेजमध्ये कन्नड माध्यमात १०वी आणि १२वीच्या वर्गात शिकलेल्या एकूण ६५२ विद्यार्थ्यांना कन्नड अभिवृद्धी प्राधिकरणातर्फे रोख पारितोषिक म्हणून, प्रथम ₹१२००० द्वितीय ₹११००० तृतीय आणि ₹१०,००० रुपये,प्रमाणपत्र ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. कन्नड अभिवृद्धी प्राधिकरणाचे सचिव डॉ संतोष हानगल स्वागत भाषण केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बसवराज धनशेट्टी, राजशेखर उमराणीकर, विद्याधरा गुरव, शरणू कोळी, रामा सोलापुरे, शरणप्पा फुलारी, प्रशांत बिराजदार व आदर्श कन्नड बळग महाराष्ट्राचे सर्व पदाधिकारी परिश्रम घेतले. महेश मेत्री आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सुगम संगीत आणि जनपद गीतांचे संगीत कार्यक्रमाने कार्यक्रमाचे सुरुवात झाली. चिदानंद मठपतींनी सूत्रसंचालन केले, तर विद्याधर गुरव यांनी आभार मानले.

कर्नाटक सरकारच्या कन्नड अभिवृद्धी विकास प्राधिकरणाने दिलेला कन्नड माध्यम पुरस्कार महाराष्ट्रातील कन्नड माध्यमांच्या विद्यार्थ्यांना कन्नड शिकण्यासाठी प्रेरित करतो, ज्यामुळे सीमेपलीकडील कन्नड मुलांचे पुढील शिक्षण सुलभ होते, असे सोमशेखर जमशेट्टी (अध्यक्ष, कन्नड साहित्य परिषद महाराष्ट्र) म्हणाले.

कर्नाटक सरकारने कर्नाटक व्यतिरिक्त महारष्ट्र बरोबर अन्य राज्यात कन्नड भाषेत शिकलेल्या मुलांना कर्नाटक राज्यात शिक्षण आणि नोकरीत आरक्षण द्यावे. आमच्या जाती प्रवर्ग योग्यरित्या स्वीकारल्या पाहिजेत. इथे शिकलेल्या मुलांनाही कर्नाटकात सर्व सुविधा मिळायला हव्यात, असे मलिकाजन शेख (अध्यक्ष, आदर्श कन्नड बळग, महाराष्ट्र) म्हणाले.

कर्नाटक - महाराष्ट्र सीमावर्ती शहर सोलापूर येथे कन्नड अभिवृद्धी विकास प्राधिकरणाने आयोजित केलेल्या कन्नड माध्यम पुरस्कार सोहळ्याला महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातून कन्नड माध्यमातून शिक्षण घेतलेलं विद्यार्थी, पालक, शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आदर्श कन्नड बळग महाराष्ट्र आणि स्थानिक कन्नड संस्थांनी विशेष सहकार्य केल्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद, असे डॉ. संतोष हानगल (सचिव, कन्नड अभिवृद्धी प्राधिकरण बेंगळुरू) यांनी म्हणाले.

# हेतू प्रामाणिक असल्यास मदतीचा ओघ अखंड : राहूल घाटगे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी/संजय चव्हाण : सैनिक टाकळी ता.शिरोळ.जि.कोल्हापुर कोणत्याही कार्यात हेतू प्रामाणिक असल्यास मदतीचा ओघ मोठ्या प्रमाणात सुरु राहतो. याची अनुभूती २०१९ च्या महापुरात गुरुदत्त कारखान्यावरील छावणी दरम्यान आली. तसाच अनुभव या शाळेबद्दल देखील येत असल्याचे मत गुरूदत्त शुगर्स चे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर राहुल घाटगे यांनी व्यक्त केले.

ते येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल मधील देणगीदारांच्या सत्कार समारंभात बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशश्री पॉलीचे चेअरमन टी. बी. पाटील होते.



घाटगे पुढे म्हणाले संस्थेने देणगीदारांच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत .त्याचा वापर योग्य प्रकारे करून आपला शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित आहे . याच बरोबर शरीर तंदुरुस्त राहण्यासाठी विविध खेळही खेळणे गरजेचे असल्याचेही ते म्हणाले. यावेळी शाळेस सिक्युरिटी केबिन देणगी दिल्या बद्दल टी. बी. पाटील यांचा सत्कार संस्थेचे सचिव राजेश पाटील यांच्या हस्ते , खोल्यांचे सीलिंग करून दिल्या बद्दल राहुल घाटगे यांचा सत्कार संचालक पी.जी .पाटील यांच्या हस्ते तर सन १९९६-९७ दहावी मधील माजी विद्यार्थ्यांनी शाळेसाठी सर्व प्रकारचे क्रीडा साहित्य उपलब्ध करून दिल्या बद्दल सचिन सनदी, ,विजय पाटील,भरत पाटील,स्मिता यादव , आण्णासाहेब पाटील यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

तसेच सीसीटीव्ही कॅमेरे उपलब्ध करून दिल्याबद्दल सयाजी पाटील, शाळेच्या विकासासाठी विशेष सहकार्य केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष एस.के. पाटील , संजय पाटील ,यु.एस पाटील, माजी शिक्षक ए.ए.इंगवले, कु.एम.एम.धुमाळे , बाळासाहेब गोते, श्रीमती मालन पाटील, सुशांत पाटील, समता शिरहट्टी, प्रियांका पाटील, अमृता पाटील यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ए ए इंगवले, एम एम धुमाळे ,सचिन सनदी, शामराव पाटील यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख मधुकर पाटील, गुरुदत्त शुगर्स चे सुरक्षा अधिकारी शामराव पाटील ,ए.टी.काटकर, यांच्या सह दोन्ही शाळेतील शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते. स्वागत मुख्याध्यापक विनोद पाटील सुत्र संचालन उदय पाटील, यांनी तर आभार आर.एस.खोपडे यांनी मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## गुन्हेगारी जगत...

### अज्ञात चोरट्याने दुकानातून मोबाईल पळवला

सोलापूर (प्रतिनिधी) शेळगी,मित्र नगर येथील महागड्या किमतीचा मोबाईल हा दुकानातील काउंटरवर ठेवलेला असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १८ सप्टेंबर रोजी रात्री आठ ते नऊ वाजण्याच्या दरम्यान घडली या प्रकरणी रामचंद्र विठोबा कांबळे (वय-२२,रा.मित्र नगर,शेळगी) याने जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्याच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार आरे-नवरू हे करीत आहेत.

### अपार्टमेंटच्या पार्किंग मधून दुचाकी लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) मेलेडी अपार्टमेंटच्या पार्किंगमध्ये पार्क केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ८ ते १८ सप्टेंबर दरम्यान मेलेडी अपार्टमेंट जुळे सोलापूर येथे घडली.याप्रकरणी वीणा ज्ञानेश्वर पवार (वय-४३,रा.मेलेडी अपार्टमेंट) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार भिसे हे करीत आहेत.

### घरातून रक्कमसह चांदीचे पैंजण पळवले

सोलापूर (प्रतिनिधी) घराचा दरवाजा पुढे केलेला असताना अज्ञात चोरट्याने घराचा दरवाजा उघडून प्रवेश करत घरातील रोख रक्कम व चांदीचे पैंजण असा एकूण ११ हजार ९०० रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे.अशा आशयाची फिर्याद अंबुबाई गोपाळ भंडारे (वय-५५,रा.स्लॅटर हाऊस,घर नंबर ९१) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.हि घटना २२ ते २३ सप्टेंबर दरम्यान घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

# जागतिक नदी दिवस उल्हासनगर महानगर पालिकेच्या वतीने साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर प्रतिनिधी/ बाळासाहेब अहिरे : २२ सप्टेंबर हा दिवस जागतिक नदी दिवस म्हणुन साजरा केला जातो. त्यानिमित्तान उल्हासनगर शहरातील नागरीकांमध्ये, शालेय विद्यार्थ्यांमध्ये नैसर्गिक जलस्त्रोतांचे संवर्धन करणे, नदी, तलाव, वहीरी प्रदुषित होणार नाहीत याबाबत दक्षता घेणे यासंदर्भात जनजागृती होणे आवश्यक आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक, श्री. विकास ढाकणे, अति. आयुक्त, जमीर लेंगरेकर, डॉ. किशोर गवस पांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागप्रमुख सौ. विशाखा सावंत यांनी चला जाणुया नदीला या अभियानाच्या ठाणे जिल्हयाच्या जलनायक तथा समन्वयक डॉ. स्नेहल दोंदे यांचे समन्वयाने दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ उल्हासनगर शहरातुन वाहणा-या नदीवरील समस्यांबाबत संबंधित विभागप्रमुखांसमवेत महापालिका मुख्यालयामध्ये बैठक घेण्यात आली. त्यानंतर उल्हासनगर शहरातुन वाहणा-या रिजन्सी ॲन्टालिया परिसरातील उल्हास नदीच्या किना-यावर नदी की पाठशाला, नदी किनारी स्वच्छता अभियान तसेच वृक्षारोपण कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते.

उल्हास नदी किना-यावर नदी कि पाठशाला अंतर्गत दुनिचंद कलानी महाविद्यालय तसेच सेंचुरी रेयॉन शाळेतील विद्यार्थी, प्राचार्य, मुख्याध्यापक व शिक्षक सहभागी झाले होते. त्यांना डॉ. स्नेहल दोंदे यांनी नैसर्गिक जलस्त्रोतांचे संवर्धन कसे करावयाचे व ते का आवश्यक आहे याबाबत मार्गदर्शन केले. सेंचुरी रेयॉन शाळेतील विद्यार्थ्यांनी प्लास्टीक पिशव्यांमुळे होणारे जलप्रदुषण रोखणे याविषयावर पथनाट्य सादर केले.

सदर उपक्रमामध्ये जल प्रतिज्ञा तसेच स्वच्छता प्रतिज्ञा घेण्यात आली. सार्वजनिक आरोगय विभागाचे स्वच्छता निरीक्षक, सफाई मुकादम तसेच सफाई कामगार यांनी नदीच्या किना-यावर साफसफाई केली. उद्यान विभागामार्फत नदीच्या किना-यालगत वृक्षारोपण करण्यात आले.

महापालिकेच्या पर्यावरण विभाग, सार्व. आरोगय विभाग तसेच उद्यान विभाग व्यतिरिक्त सर्व सहा. आयुक्त तथा प्रभाग अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, पाटबंधारे विभाग, वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. त्याचप्रमाणे चला जाणुया नदीला या अभियानाअंतर्गत उल्हासनगर शहराकरीता नियुक्त जलप्रहरी ड.सरीता खानचंदानी व श्री. हरी चावला हेदेखील उपस्थित होते.

# अक्कलकोट येथे रिपाइं आठवले तालुका कार्यकारिणीची बैठक संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट(प्रतिनिधी)दि २३- सातारा येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाचा ३ऑक्टोंबर रोजी ६७ वा वर्धापन दिन सातारा येथे साजरा होणारा राष्ट्रीय अधिवेशनाच्या औचित्य साधून अकलकोट येथे बैठक मा.तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला आहे.

बैठकीत कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी पूर्वतयारी नियोजन बैठक आयोजित करण्यात आले होते सातारा येथे होणारा कार्यक्रमास रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदार रामदास आठवले प्रमुख मार्गदर्शन करणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा.राजाभाऊ सरवदे हे राहणार आहेत अशी माहिती जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी दिले आहे व सातारा येथे होणाऱ्या राष्ट्रीय अधिवेशनास अक्कलकोट तालुक्यातून पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. अक्कलकोट येथील मैंदर्गी रोडवरील भक्तनिवास येथे संपन्न,झालेल्या बैठकीच्या प्रस्तावना विजय पोतेनवरु यांनी केली या प्रसंगी रिपाइं युवक ता अध्यक्ष अप्पा भालेराव,शहर अध्यक्ष अजय मुकणार, कोषाध्यक्ष अंबादास गायकवाड, उपाध्यक्ष चंद्रकांत गायकवाड, संदीप गायकवाड,प्रकाश गडगडे, कार्याध्यक्ष राजेसाब बोरगाव, युवक शहर सरचिटणीस शुभम मडिखांबे, शहर संघटक सचिव अंबादास शिंगे, ता संघटक विलाश गायकवाड शहर उपाध्यक्ष सुरेश सोनकांबळे, शहर कोषाध्यक्ष सुरेश गायकवाड, शहर युवक अध्यक्ष नितेश मडिखांबे, वाहतूक आ ता उपाध्यक्ष इस्माईल आळंद, गायकवाड,ता प्रसिध्दी प्रमुख मंजूनाथ बनसोडे,ता सचिव रवि सलगरे,उमेश शिवशरण,महिबूब शेख ग्रा पं सदस्य तडवळ, दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी,मुआ दुधनी शहर अध्यक्ष मेहदिमिया जिडगे, बबलाद सरपंच बाबु निरगुडे, आंदेवाडीचे सरपंच रमेश धोडमनी, मुंडेवाडीचे ग्राम पं सदस्य दिलिप माळी,सांगवीचे सदस्य वालचंद सोनकांबळे, शाखाध्यक्ष भिमा गायकवाड, कुरनूरचे सदस्य राजकुमार गवळी, राजू वाघमारे, शहर प्रसिध्दी प्रमूख, वाहतूक आ ता सचिव सचिन बनसोडे, तडवळचे राजू गायकवाड, सिध्दाराम गायकवाड, सनी गायकवाड, अजय मडिखांबे, नागेश बाबर, निंगप्पा निंबाळ, राजू कांबळे, दस्तगीर मुजावर, अ कोट स्टेशन शाखाध्यक्ष किसन कदम,आदी सह ईतर मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

# बार्टी मार्फत अनुसूचित जातीतील उमेदवारांसाठी पुणे येथे मोफत उद्योजकता विकास कार्यशाळेचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे आणि COEP's भाऊ इन्स्टिट्यूट ऑफ इनोव्हेशन, पुणे (COEP टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी) यांच्या संयुक्त विद्यमाने कौशल्य विकास विभागाद्वारे बुधवार, दिनांक २५ सप्टेंबर २०२४ रोजी पुणे येथे अनुसूचित जातीतील (SC) उमेदवारांसाठी मोफत उद्योजकता विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेची उपयुक्तता: अनुसूचित जातीतील उमेदवारांना उद्योजकता आणि व्यवसायाचे ज्ञान प्रदान करणे. उद्योजकता क्षेत्रात कौशल्य विकासासाठी मार्गदर्शन करणे. उद्योजकतेतील संधींची ओळख करून देणे. कार्यशाळेसाठी पात्रता: विद्यार्थ्यांसाठीकार्यरतव्यावसायिक किंवा नोकरी करणाऱ्यांसाठी उद्योजक किंवा व्यवसायिकांसाठी वेळ: सकाळी १०:०० ते संध्याकाळी ५:३० स्थळ: COEP टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, COEP भाऊ इन्स्टिट्यूट, शिवाजीनगर, पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे. आयोजक डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे असून नाव नोंदणीसाठी: नोंदणी लिंक - https://rb.gy/pcyiqn अधिक माहितीसाठी, कृपया बार्टीच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्या: www.barti.in बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनील वारे यांनी अनुसूचित जातीतील युवकांना या कार्यशाळेत सहभागी होऊन उद्योजकतेच्या दिशेने पाऊल उचलण्याचे आणि समाजातील विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. या कार्यशाळेत सहभागी होऊन, उद्योजकता आणि व्यवसायाच्या क्षेत्रात यशस्वी करिअर घडवण्याची संधी मिळवा!

# मोर्चा यशस्वी करण्यासाठी चर्मकार समाजातील पदाधिकाऱ्यांचा शिरोळ तालुका दौरा : सुनील माने

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिरोळ/नामदेव निर्मळे : राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक -अध्यक्ष व माजी मंत्री बबनराव घोलप ( नाना ) यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी १ ऑक्टोबर रोजी मुंबई येथील आझाद मैदान येथे चर्मकार समाजाच्या हितासाठी व सर्वांगीण विकासाकरिता विविध मागण्यासाठी चर्मकार समाजाचा धडक मोर्चा आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुनील माने म्हणाले, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रमुख पदाधिकारी व चर्मकार समाजातील नेत्यांच्या उपस्थितीत मुंबई येथे हजारो चर्मकार समाज बांधवांच्या उपस्थितीत होणार आहे.शासकीय पातळीवर अनेक योजना राबविल्या जात असल्या तरीचर्मकार समाजातील घटकाला अजूनही उपेक्षित राहावे लागत आहे. त्यामुळे समाजाच्या विविध मागण्यासाठीसंघटित होऊन चर्मकार समाज न्यायासाठी लढा देत आहे. मोर्चा यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील अनेक भागात समाज जनजागृती केली जात असून या मोर्चात चर्मकार समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले.



राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी शिरोळ तालुक्यातील अनेक गावांना भेटी देऊन प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्याशी विविध प्रश्नावर चर्चा केली. यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघ महिला अध्यक्षा सरोजताई बीसुरे , पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुनील माने, राज्य सल्लागार रावसाहेब चव्हाण, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष दीपक खांडेकर यांच्यासह आदी उपस्थित होते.

# यादव गायकवाड राज्यस्तरीय शिक्षक गौरव पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हिंगोली/प्रतिनिधी : जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पांगरा शिंदे ता.वसमत जिल्हा हिंगोली येथील प्राथमिक शिक्षक श्री यादव कामाजी गायकवाड यांना समर्थ फाउंडेशन ठाणे व एजुरिक हब ठाणे यांच्या तर्फे देण्यात येणारा राज्यस्तरीय शिक्षक गौरव पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे येथील सभागृहात कोकण पदवीधर मतदार संघाचे विधान परिषद सदस्य आमदार ड. निरंजन डावखरे, ठाणे वैभव वर्तमानपत्राचे संपादक मिलिंद बल्लाळ, समर्थ फाउंडेशन व एजुरिक हब ठाणे चे संस्थापक प्रा. डॉ दिपक साबळे, ॲड. सुनीता साबळे यांच्या हस्ते श्री यादव गायकवाड यांना 'राज्यस्तरीय शिक्षक गौरव पुरस्कार २०२४' या शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

जिल्हा परिषद शाळेत शिक्षक या पदावर कार्यरत असलेल्या श्री यादव गायकवाड यांनी सहा विषयात पदव्युत्तर पदवी चे शिक्षण पूर्ण केले आहे त्याच बरोबर नऊ सेट नेट च्या परीक्षा विविध विषयातून उतीर्न केल्या आहेत, विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल मध्ये शोध निबंध लिहलेले आहेत ,सध्या ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात पी.एच. डी. संशोधन कार्य करत आहेत.प्राथमिक शिक्षक पदावर कार्यरत राहून केलेल्या या शिक्षण क्षेत्रातील अतुलनीय कामगिरी बद्दल त्यांना सन्मान देत असल्याचे समर्थ फाउंडेशन अँड एज्युकेशनल हब ठाणे चे अध्यक्ष डॉ दिपक साबळे म्हणाले. यादव गायकवाड यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री संजय कुमार कुऱ्हे ,दिलीप कोल्हे ,अमोल गायकवाड व सर्व मित्र परिवार यांच्या तर्फे अभिनंदन केले जात आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते मोहोळ विधानसभा मतदासंघातील विविध विकास कामांचा शुभारंभ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : मोहोळ विधानसभा मतदारसंघातील अनगर नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनेचा तसेच मोहोळ शहरातील भूमिगत गटार योजनेच्या कामांचा शुभारंभ राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी खासदार सुनिल तटकरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, मोहोळचे आमदार यशवंत माने,माजी आमदार राजन पाटील, उपविभागीय अधिकारी पंढरपूर/मोहोळ सचिन इथापे, तहसिलदार सचिन मुळीक, मोहोळ नगरपरिषदेचे मुख्याधिकारी योगेश डोके, अनगर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी सुरेश भदर,अभियंता गणेश बागल आदी मान्यवर व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. मोहाळ तालुक्यात नगर विकास विभागाच्या नगरोत्थान महाभियान या योजनेच्या माध्यमातून अनगर नगरपंचायतचा पाणी पुरवठा प्रकल्प योजनेचा शुभारंभ राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज अनगर ता.मोहोळ येथे पार पडला. या योजनेसाठी ७८ कोटी ८५ लाखाचा निधी मंजूर आहे ही योजना पूर्ण झाल्यानंतर अनगरवासीयांना शुद्ध पाणीपुरवठा नियमितपणे करणे शक्य होणार आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत मोहोळ शहरात भूमिगत गटार योजनेच्या कामाचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते लोकनेते बाबुराव अण्णा पाटील चौक मोहोळ येथे पार पडले. मोहोळ शहरामध्ये सद्यस्थितीत मलनिस्सारण हे उघड्या गटारीतून केले जात असून सदरील मलनिस्सारण हे शहरामधील नाल्या मध्ये सोडले जाते व नंतर ते पाणी सीना नदीमध्ये जाते, त्यामुळे नदी प्रदूषित होत असून उघड्या गटारींमुळे शहरामध्ये रोगराई पसरण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोहोळ शहराच्या पुढील ३० वर्षाच्या लोकसंख्या विचारात घेऊन नवीन भूमिगत गटार योजना मंजूर करण्यात आलेली आहे. योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर मोहोळ शहरातील नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

**आयुष्यमान भारत मिशन योजनेच्या माहितीसाठी १८००२३३२२०० या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा**

**डॉ. ओमप्रकाश शेटे**

# जन आरोग्य योजनांचा लाभ शेवटच्या लाभार्थ्यापर्यंत पोहोचण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घ्यावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : एकत्रित प्रधान मंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना या आरोग्य योजनांचा लाभ तळागाळातील जास्तीत जास्त नागरिकांना घेता यावा यासाठी जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घ्यावा यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबवावी, असे आवाहन आयुष्यमान भारत मिशन समितीचे प्रमुख डॉ. ओम प्रकाश शेटे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आयुष्यमान भारत मिशन अंतर्गत च्या योजनांच्या कामकाजाचा आढावा बैठकीत डॉ. शेटे बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा शल्य चिकित्सक सुहास माने, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना सोलापूर जिल्हा समन्वयक डॉ.माधव जोशी, डॉ. दीपक वाघमारे, सोलापूर महानगरपालिकेच्या डॉ. मंजिरी कुलकर्णी जिल्ह्यातील विविध रुग्णालयाचे डॉक्टर्स व प्रतिनिधी उपस्थिती होते.

डॉ. शेटे पुढे म्हणाले की सोलापूर जिल्ह्यातील एक ही पात्र लाभार्थी शासनाच्या आरोग्य योजना पासून वंचित राहणार नाही यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी प्रयत्न करावे. महात्मा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत जास्तीत जास्त लाभार्थी पात्र ठरतील यासाठी त्यांना सहकार्य करावे. या आरोग्याच्या योजना तळागाळातील नागरिकापर्यंत पोहोचण्यासाठी जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्थांनी व सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन या लोकांमध्ये योजनेविषयी जनजागृती करून त्यांना योजनेचे महत्त्व पटवून दिल्यास एकही रुग्ण वैद्यकीय सेवेपासून वंचित राहणार नाही असे त्यांनी सांगितले.

**सोलापूर जिल्ह्यात एकुण लाभार्थी प्रधानमंत्री एकुण लाभार्थी ११ लाख ५८ हजार ७५८, पिवळे व केसरी रेशन कार्ड लाभार्थी ११ लाख ८८ हजार १९७, शुभ्र रेशन कार्ड लाभार्थी १६ लाख ६५ हजार ६९७, एकुण लाभार्थी संख्या ४० लाख १२ हजार ६५२, एकुण आयुष्यमान कार्ड वाटप १० लाख ४३ हजार ६७१, सोलापूर जिल्ह्यात एकुण आयुष्यमान कार्ड वाटप २६ टक्के झाले असून एकुण आयुष्यमान कार्ड पेंडिंग २९ लाख ६९ हजार ४१, सोलापूर जिल्ह्यात एकुण आयुष्यमान कार्ड पेंडिंग ७४ टक्के आहेत. तरी आयुष्यमान भारत योजनेचे प्रलंबित असलेले सर्वकाळ लवकरात लवकर लाभार्थ्यांना पोहोचतील याबाबत सर्व संबंधित यंत्रणांनी नियोजन करावे असे डॉक्टर शेटे यांनी सुचित केले.**

तसेच जन आरोग्य योजना सर्वसामान्य पर्यंत पोहोचण्यासाठी आरोग्य मित्रांची संख्या वाढविण्यात यावी व आपले १२ अंकी रेशन कार्ड अद्यावत करून घ्यावे. जिल्हा पुरवठा विभागाने रेशन कार्ड अद्यावत करण्यासाठी मदत करावी. या योजनेचा लाभ देण्यासाठी जिल्ह्यात प्राधिकृत केलेल्या रुग्णालयांनी त्यांच्याकडे योजनेअंतर्गत रुग्णांची नोंदणी झाल्यास त्या रुग्णाला तात्काळ सर्व विविध नियमवलीप्रमाणे दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. रुग्णालयातील आरोग्य सुविधा व अन्य सुविधाच्या अनुषंगाने योजनेच्या एकाही रुग्णांची अथवा त्याच्या नातेवाईकांची तक्रार येणार नाही याबाबतही रुग्णालयांनी योग्य ती दक्षता घ्यावी असेही डॉ. शेटे यांनी सूचित केले.



प्रारंभी जिल्ह्यात आरोग्य योजनेविषयी झालेल्या कामकाजाची माहिती डॉक्टर जोशी यांनी दिली. या योजनेमध्ये सरकारी रुग्णालयांची एकुण संख्या ७, खाजगी रुग्णालयांची संख्या ५७, मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल्सची संख्या ५३, एकल विशेष रुग्णालयांची संख्या ११, आरोग्यमित्रांची संख्या ८४ इतके असून योजनांचा तळागाळात प्रचार व प्रसार करण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याची माहिती योजनेचे जिल्हा समन्वयक डॉक्टर माधव जोशी यांनी यावेळी सांगितले.

आयुष्यमान भारत मिशन योजनेच्या माहितीसाठी १८००२३३२२०० या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

## थोडक्यात



### कै. अनिल माधवराव अग्रहारकर यांच्या व्दितीय पुण्यस्मरण निमित्त वृक्षारोपण

शिर्डी/ संजय महाजन : मा.क्रेडाई खजिनदार, आदर्श उद्योजक कै.अनिल माधवराव अग्रहारकर यांच्या व्दितीय पुण्यस्मरण निमित्त लोणी काळभोर सिद्राममळा,सकट वस्ती येथील परिसरात वड,पिंपळ, नारळ,आवळा अशा जंगली व फळ वृक्ष लावून पुण्यस्मरण कार्यक्रम करण्यात आला.साधना सहकरी बँक मा.व्हा.चेअरमन ,विद्यमान संचालक श्री. बाळासाहेब बापुराव कोळपे यांचे ते व्याही होत. या वेळी लोणी काळभोर माजी ग्राम पंचायत सदस्य सुभाष आण्णा विरकर ,ग्रीन फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष अमित जगताप, हवेली तालुकाध्यक्ष गणेश काळभोर, अमर जाधव, शुभम जाधव,अजिंक्य काळभोर, सुधीर सकट,गणेश पातडे उपस्थित होते.

### कल्याण रेल्वे स्थानक काशी एक्सप्रेस चे बोगी पुढचे मागे केल्याने प्रवाशांची पळापळ

उल्हासनगर / बाळासाहेब अहिरे

कल्याण रेल्वे स्टेशन हे नेहमीप्रमाणे प्रवासांनी गजबजलेले असते मात्र आज काशी एक्सप्रेस सकाळी सात वाजून पंधरा मिनिटाला वेळेवर येत असते आणि त्याचे बोगी क्रमांक प्रवाशांना दिसावे म्हणून इंडिकेटर वरती जनरल पासून ते रिझर्वेशन सर्व भोगीचे इंडिकेटर चालू होते मात्र आज काशी एक्सप्रेस कल्याण स्थानकावर येतच आपले तिकिटे घेऊन ज्या ठिकाणी बोगि येणार त्या बोगीच्या जागेवरती प्रवाशी उभे होते मात्र त्या ठिकाणी रेल्वे भोगी न आल्याने प्रवासाची तारांबळ उडाली आणि प्रवासी आपला बोगी शोधण्यास पळापळ सुरू केले त्यामुळे लहान मुले वय वृद्ध नागरिक महिला या प्रवासाची गैरसोय झाली त्याला जबाबदार कोण असे प्रवासाचे चर्चा सुरू झाली

# राज्यातील कोतवालांना चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून सामावून घ्या



## आ. समाधान आवताडे यांनी महसूल मंत्री ना.विखे- पाटील यांना दिले पत्र

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्याच्या महसूल विभागातील कोतवाल कर्मचाऱ्यांना वेतन श्रेणी निश्चित करून शासकीय सेवेमध्ये चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून सामावून घेण्यात यावे या मागणीसाठी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी राज्याचे महसूल मंत्री मा.ना.राधाकृष्ण जी विखे-पाटील यांची मंत्रालयीन दालनात भेट घेऊन सदर मागणीचे त्यांना पत्र दिले आहे.

महाराष्ट्र राज्यातील कोतवाल ही शासकीय कामास बांधील राहून कर्तव्य व जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. राज्यातील लोकसंख्या ठिकाणी कोतवाल हे सजा मुख्यालय सोडून जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय कार्यालय, तहसील कार्यालय या ठिकाणी वर्ग ३ व वर्ग ४ या पदावरील कर्मचाऱ्यांची कामे वरिष्ठांच्या लेखी व तोंडी आदेशानुसार करत आहेत. कोतवाल हे पद महसूल विभागातील गाव पातळीवर शेवटचे महत्त्वाचे पद आहे.

निवडणुका व विविध शासकीय योजना सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

गाव पातळीवरील विविध शासकीय व निम-शासकीय कर्तव्याशी बांधील राहून लोककेंद्रीत विविध योजनांच्या विस्तारासाठी कोतवाल हा महत्व-पूर्ण समन्वयक समजला जातो. कोतवाल बांधवांच्या भविष्यसाध्य बाबींचा विचार करून त्यांना या पदावर नेमणूक द्यावी अशी मागणी यावेळी आमदार आवताडे यांनी सदर पत्रामध्ये नमूद केली आहे.

सदरप्रसंगी जेष्ठ पत्रकार अबुक सुतार तसेच संबंधित प्रशासकीय विभागातील अधिकारी आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# उपोषणकर्ते संजय शिंदे यांची तब्येत खालावली

## गेंड्याच्या कातडीचे प्रशासन एन पी इंफ्रा कंपनीच्या विरोधात कारवाई का करत नाही





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/अतुल सोनकांबळे : इंदापूर तहसील कार्यालयाच्या समोर एन पी इंफ्रा कंपनीच्या विरोधात संजय शिंदे यांनी छेडलेल्या आमरण उपोषणाचा ४थ्या दिवस असुन सोमवारी सकाळी उपोषणकर्ते संजय शिंदे यांची तब्येत खालावली.संजय शिंदे यांची वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केली. त्यांना रुग्णालयात दाखल होण्यास सांगितले असता प्रथम त्यांनी नकार दिला होता, परंतु इंदापुर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांनी उपचार घेण्यासाठी विनंती केल्यानंतर संजय शिंदे यांना पुढील उपचारासाठी इंदापुर येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आम्ही एन.पी.इन्फ्रा कंपनीच्या गैरकारभाराबाबत छेडलेले उपोषण हे सुरूच ठेवणार असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे. उपोषण स्थळी अद्याप तरी प्रशासन अथवा सत्ताधारी कोणीही उपोषणस्थळी येण्याची तत-परता का दाखवत नाहीत याचे उत्तर. किंबहुना आम्ही उपस्थित केलेला प्रश्न आम्ही मांडलेले मुद्दे योग्यच आहे हे त्यांना माहिती असल्याने प्रशासन अथवा सत्ताधारी यांची उपोषण-स्थळी सामोरे येण्याची हिम्मत होत नाही, असे संजय शिंदे बोलताना म्हणाले . जनतेने आमच्या उपोषण-स्थळी भेटी दिल्या. उपोषणाचे मुद्दे योग्य असल्याचे नागरिकांनी सांगत अनेकांनी लेखी स्वरूपात आमच्या उपोषणास पाठिंबा असल्याचे स्पष्ट केले आहे, असे उपोषणकर्ते संजय शिंदे यांनी सांगितले.

## आज ३७६ प्राथमिक शाळा आणि ९५८ प्राथमिक शिक्षक सामुहिक रजेवर जावून जिल्हाधिकारी कार्यालयावरील मोर्चात सहभागी होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर / अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुका सर्व शिक्षक संघटना समन्वय समिती.आज वरीलप्रमाणे शिक्षक मागण्यांचे निवेदन मा.गटशिक्षणाधिकारी अजिंक्य खरात साहेब यांना सर्व शिक्षक संघटनांच्या तालुकाध्यक्ष यांचा सहभाग असलेल्या समन्वय समितीने दिले.

यामध्ये शिक्षक संघ तालुकाध्यक्ष नानासाहेब नरूटे, शिक्षक समिती तालुकाध्यक्ष सुनिल शिंदे,इब्टाचे तालुकाध्यक्ष मंगेश शेंडे ,कास्ट्राईबचे तालुकाध्यक्ष सुहास मोरे ,शिक्षक संघ (शिवाजी राव पाटील गट) चे तालुकाध्यक्ष अनिल रूपनवर, शिक्षक भारतीचे तालुकाध्यक्ष सतीश शिंदे ,जुनी पेन्शनचे तालुकाध्यक्ष सचिन दराडे,शालार्थचे अदिनाथ धायगुडे यांचा समावेश होता.

यावेळी तालुक्यातील शिक्षकांनी ताबडतोब सामुहिक रजेचे अर्ज सादर करावेत. प्रत्येक संघटनेच्या तालुका कार्यकारणीतील पदाधिकाऱ्यांनी केंद्रातील शिक्षकांचे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चास जाण्यासाठीचे नियोजन करण्यात यावे असे आवाहन सर्व तालुकाध्यक्ष यांनी केले.




# अरुणराव शिंदे-गायकवाड यांना नवराष्ट्र रत्न २०२४ पुरस्कार प्रदान

## श्री साई भक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्टच्या माध्यमातून धार्मिक, सामाजिक, वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय काम गिरीबद्दल पुरस्कार प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिर्डी/संजय महाजन : दैनिक नवभारत नवराष्ट्र आयोजित नवराष्ट्र रत्न पुरस्कार २०२४ सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला या पुरस्कार सोहळ्यात सामाजिक,धार्मिक,राजकीय,वैद्यकीय,कृषी,पर्यटन,उद्योजक,शैक्षणिक अश्या विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या जिल्हा व जिल्हयाबाहेरील ५० कर्तृत्ववान मान्यवरांना नवराष्ट्र रत्न २०२४ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शिर्डीतील श्री साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्टचे व्यवस्थापकिय विश्वस्त श्री अरुणराव शिंदे - गायकवाड यांना धार्मिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल नवराष्ट्र रत्न २०२४ पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार प्राप्त अरुणराव शिंदे - गायकवाड हे श्री साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्टच्या माध्यमातून श्री साई बाबांचा प्रचार आणि प्रसार करत असतात या ट्रस्टच्या माध्यमातून मकर संक्रांतीच्या दिवशी लक्ष्मी यज्ञाचे आयोजन केले जाते तसेच या यज्ञात सहभागी होण्यासाठी राज्य परराज्यातील आणि विविध देशातील भाविक येत असतात त्याचप्रमाणे ट्रस्टच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप,अन्नदान केले जाते तर वैद्यकीय क्षेत्रात देखील श्री साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्टचे मोठे योगदान लाभत असते ..आजवर ५ हजारांच्या वर रुग्णांची मोतीबिंदू मुक्त शिर्डी परिसर अंतर्गत मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया ट्रस्टच्या माध्यमातून केली असून अविरतपणे ही सेवा साईबाबांची सेवा म्हणून सुरू असते.

श्री. अरुणराव शिंदे-गायकवाड पा. यांच्या वतीने साई ९ ग्रुप चे संचालक श्री. साईराज अरुणराव गायकवाड पा.यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

या पुरस्कार सोहळ्याला माजी मंत्री प्राध्यापक राम शिंदे, आ संग्राम जगताप,पद्मश्री पोपटराव पवार, नवराष्ट्र वृत्तपत्र समूहाचे ग्रुप प्रेसिडेंट ए श्रीनिवास राव,कार्यकारी संपादक संजय मलमे,आंतरराष्ट्रीय ख्यातीचे डॉ प्रकाश कांकरिया,,डॉ सुधा कांकरिया,आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिल्प व चित्रकार प्रमोद कांबळे,साहित्य व कथाकार डॉ संजय कळमकर यांसह मान्यवरांची उपस्थिती होती.

# लाडक्या शिक्षिकेच्या निरोप समारंभ प्रसंगी पालकांसह चिमुकल्यांनाही झाले अश्रू अनावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिर्डी/प्रतिनिधी : नुकत्याच अहमदनगर जिल्हा परिषद अंतर्गत झालेल्या विनंती बदली प्रक्रियेतून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मालुंजा बुद्रुक तालुका श्रीरामपूर येथील आदर्श शिक्षिका आदरणीय रेश्मा अनिल तोरणे यांची बदली झाली. त्यांच्या निरोपाच्या सोहळ्याला विद्यार्थी व पालकांना आपले अश्रू अनावर झाले. सहा वर्षांपूर्वी या शाळेमध्ये रेश्मा अनिल तोरणे या रुजू झाल्या होत्या. विद्यार्थी प्रिय,संवेदनशील,प्रेमळ,आदर्श शिक्षिका,आपल्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व शाळेत १००% विद्यार्थी उपस्थितीसाठी नवनवीन उपक्रम राबवणाऱ्या, संत,महापुरुषांवर कविता लेखनाचा व्यासंग असलेल्या शिक्षिका यांचा शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सरपंच,गावकरी, पालक वर्ग यांच्या पुढाकाराने अद्भुत असा निरोप समारंभाचा कार्यक्रम करण्यात आला.

**आपले शरीर हे निवृत्ती घेताना सर्वांचा निरोप घेते, मात्र विचार आणि रुजवलेले आचार,संस्कार हे निरोप ही घेत नाही,अन कधी निवृत्तही होत नाही.ते पाझरत राहतात पुढच्या पिढीसाठी.भविष्य घडवण्यासाठी ही माणूस म्हणून जगायला शिकवणारी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मालुंजा अन तेथील हे गुरुवर्य सतत नवीन प्रेरणा देत राहतील.केवळ त्या गावासाठीच नव्हे तर आम्हा सर्वांसाठी हा क्षण निरोपाचा आहे,मात्र स्वप्न उद्याचे आहे. याप्रसंगी अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या शिक्षिकेबद्दल मनोगत व्यक्त करून व कविता सादर करून कृतज्ञता व्यक्त केली.**

याप्रसंगी मालुंजा गावचे प्रथम नागरिक विद्यमान सरपंच व अशोक सहकारी साखर कारखाना अशोक नगर संचालक श्री.अच्युतराव बडाख, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हा संघटक श्री.बाळासाहेब बडाख तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्री. आदिनाथ बडाख,पत्रकार श्री.आबासाहेब कुमावत, राष्ट्रवादी तालुका सचिव श्री.किशोर बडाख,तंटामुक्ती अध्यक्ष श्री.विजय बडाख, शाळा विकास कमिटी अध्यक्ष श्री.संजय बडाख, शाळा व्यवस्थापन समिती शिक्षणप्रेमी श्री.एन.डी नाना,श्री.अरुण कवडे सर, श्री सुरेश नागुडे सर.श्री.ज्ञानेश्वर बडाख,श्री संजय बोरुडे,श्री.गंगाधर परदेशी, श्री.अरुण बर्डे,श्री.सचिन बडाख,श्री.नामदेव बोरुडे,श्री संजय आव्हाड,श्री.महेंद्र थोरात युवा कार्यकर्ते पढेगाव,श्री.अमितकुमार तोरणे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.तर श्री राजाराम गोरे,श्री.अण्णासाहेब मोकळ,श्री. संतोष बनसोडे,श्री.सतीशबनसोडे,सौ. संगीता गोरे,सौ.सविता मोकळ सौ.सुनीता बनसोडे,व इंदुबाई बनसोडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री.किशोर बडाख यांनी स्वीकारले तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.मोरे चंद्रकांत सर तर आभार श्री बनसोडे सतीश यांनी केले. उपस्थित पालक वर्ग व मान्यवरांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थ्यांच्या महिला पालकही मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक गुणवत्ते बरोबरच सर्वांगीण विकास साधत असताना इंग्रजी माध्यमांच्या शाळांशी स्पर्धा करणारी व मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा तालुकास्तराचे दोन लाखाचे द्वितीय क्रमांकाचे बक्षीस मिळवणाऱ्या आमच्या शाळेस आदरणीय



रेश्मा तोरणे मॅडम यांची बदली झाल्याने जणू कुणाची नजर लागल्यासारखे झाले की काय असे उद्गार विद्यमान सरपंच श्री.अच्युतराव बडाख यांनी काढले. तसेच सदर कार्यक्रम प्रसंगी श्रीम.रेश्मा तोरणे मॅडम यांनी शाळेस खुर्च्या व विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन दिले. तसेच या कार्यक्रमास वर्गातील विद्यार्थ्यांच्या महिला पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री.बाळासाहेब बडाख,उपाध्यक्ष श्री आदिनाथ बडाख,पत्रकार आबासाहेब कुमावत व शाळेच्या मुख्या. श्रीम.सविता राहिंज मॅडम, श्री.सुनील गिरमे,श्री चंद्रकांत मोरे,श्री गोरक्षनाथ गोल्हार,श्रीम.मिरा धिंदळे,श्री.अंबादास पवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

## स्वेरीत प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ संपन्न

### प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांचे प्रतिपादन

# हुशारीला चिकाटीची जोड दिल्यास करिअरमध्ये यश अटळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूरः 'ध्येय साध्य करण्यासाठी ज्या गोष्टी करायला आवडत नाहीत त्या गोष्टी प्रयत्नपूर्वक करणे गरजेचे आहे. यासाठी वेळप्रसंगी मनावर देखील सकारात्मक दादागिरी केली पाहिजे. अभियांत्रिकीमधून करिअर करताना कोणती ब्रँच मिळाली हे महत्वाचे नाही, त्यापेक्षा मिळालेली ब्रँच ही जगातील सर्वोत्तम ब्रँच आहे असे समजून त्या ब्रँचला योग्य न्याय देण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला पाहिजे कारण करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी 'हार्ड वर्क' करण्याची गरज आहे. 'हार्ड वर्क'मुळे हुशारी देखील वाढते. हुशारीला चिकाटीची जोड दिल्यास करिअर मध्ये हमखास यश मिळते.' असे प्रतिपादन स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे





प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट मधील अभियांत्रिकीच्या पदवी, पदविका व एमबीए या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष तसेच थेट द्वितीय वर्ष इंजिनिअरिंगला प्रवेश घेतलेले विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी आयोजिलेल्या स्वागत समारंभा प्रसंगी स्वेरीचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे हे मार्गदर्शन करत होते. व्यासपीठावर पालक प्रतिनिधी म्हणुन प्रताप वाघ व महिला पालक प्रतिनिधी म्हणून सौ.वैशाली स्वामी हे उपस्थित होते. दीपप्रज्वलनानंतर प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी प्रास्ताविकात 'ग्रामीण भागात स्वेरीची सुरवात केलेल्या डॉ. बी. पी. रोंगे सरांनी विद्यार्थ्यांसाठी १९९८ पासून तंत्रशिक्षणाचे दालन खुले केले. २६ वर्षांच्या कालावधीत ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थी आज मोठ्या पॅकेजसह देशात आणि परदेशात स्थायिक होवून ते उत्तम करिअर करत आहेत. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात 'स्वेरी'चा आज राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक आहे,' असे सांगून आजपर्यंतच्या वाटचालीतील महत्वाच्या टप्प्यांवर लक्ष वेधले.

पुढे बोलताना संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.रोंगे म्हणाले की, 'आपल्याला मातृभाषेचा अभिमान असलाच पाहिजे पण करिअरची इमारत पक्की बांधायची असेल तर आंतरराष्ट्रीय स्तरावर स्कोप असलेल्या इंग्रजी भाषेमधून संभाषण करण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये बदल करणे आणि करिअरच्या दृष्टीने त्यांची सर्वोत्तम तयारी करून घेणे हाच स्वेरीचा उद्देश आहे. विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी आमचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सज्ज आहेत. स्वेरीमधून नापास होणे ही बाब अत्यंत अवघड आहे तर गुणवत्ता यादीत येणे, फर्स्ट क्लासमध्ये पास होणे या बाबी मात्र स्वेरीत खूप सोप्या आहेत म्हणून पालक व विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या माध्यमातून स्वेरीवर टाकलेला विश्वास मुळीच वाया जाणार नाही.' असे सांगून विद्यार्थ्यांनी टीव्ही, मोबाईल, तथाकथित मित्र व आपल्या स्वतःचा नकारात्मक दृष्टीकोन या चार गोष्टींपासून दूर राहण्याचा कानमंत्रही प्राचार्य डॉ. रोंगे यांनी दिला. याप्रसंगी गोपाळपूरचे माजी उपसरपंच विक्रम आसबे, संभाजी शिंदे, प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. स्नेहा रोंगे, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त एन.एस. कागदे, विश्वस्त एच.एम.बागल, विश्वस्त बी.डी. रोंगे, युवा विश्वस्त प्रा. सुरज रोंगे, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता प्रा. करण पाटील, सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व विविध भागांतून आलेले त्यांचे पालक असे मिळून सुमारे चार हजारांहून अधिक विद्यार्थी व पालक या कार्यक्रमास उपस्थित होते. प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी सुत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले.

**स्वेरी कॅम्पस मधील भाषा ही इंग्रजी असल्याने प्राचार्य डॉ. रोंगे सर देखील सर्वांशी इंग्रजीमधूनच संवाद साधतात पण आज स्वागत मेळाव्याला आलेल्या पालकांचा विचार करून त्यांना मराठी भाषेत संवाद साधावा लागला. 'मराठी भाषे'त बोलण्यासाठी विद्यार्थ्यांकडून परवानगी घेण्याचे डॉ. रोंगे सर विसरले नाहीत. डॉ. रोंगे सरांचे विचार ऐकण्यासाठी निरव शांतता पसरली होती तर पालकांची विक्रमी गर्दी पाहून पावसानेही व्यत्यय आणला नाही. मार्गदर्शन सत्रानंतर मात्र वरुणराजा मनसोक्त बरसला.**